# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/बातमी/ई-मेल/२०१९ दि. ०६ डिसेंबर,२०१९

जळगाव दि.०६ ( ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील डॉ.आंबेडकर विचारधारा व सामाजिकशास्त्र प्रशाळेच्यावतीने ६ डिसेंबर रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिना निमित्त भाषा अभ्यासप्रशाळा व संशोधन केंद्रांचे संचालक, प्रा.डॉ.म.सु.पगारे यांचे विशेष व्याख्यान झाले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी व्यवस्थापनशास्त्र प्रशाळेचे संचालक तथा डॉ.आंबेडकर विचारधारा विभागाचे प्रमुख प्रा.डॉ.अनिल डोंगरे होते. यावेळी बार्टीचे संचालक प्रा.डॉ.अजय सुरवाडे हे उपस्थित होते. प्रा.डॉ.म.सु.पगारे यांनी आज संविधान स्वीकारुन ७० वर्षे उलटली तरीही डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना अभिप्रेत असणारा बुध्दिनिष्ठ व विवेकी समाज निर्माण होऊ शकला नाही. मानव कल्याणाच्या आड येणाऱ्या विषमता नष्ट करुन समतेचे विचारतत्व डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी दिले. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना अभिप्रेत असणारा समाज निर्माण करण्यासाठी वैज्ञानिक, बुध्दिनिष्ठ व विवेकी जीवन जगणे हेच खरे अभिवादन ठरेल. असे प्रतिपादन केले. अध्यक्षीय समारोप करतांना प्रा.डॉ.डोंगरे म्हणाले की, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची जातीविहीन वर्गविरहित समाज निर्माणासाठी प्रत्येक बुध्दिजीवीनी झटले पाहिजे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.विजय घोरपडे यांनी केले. सुत्रसंचालन प्रा.हर्षल पाटील यांनी केले. आभार विकी साळवे याने मानले.

---

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,
उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिद्ध करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क  धिकारी

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/बातमी/ई-मेल/२०१९ दि. ६ डिसेंबर,२०१९

जळगाव दि.६ ( ) सिलेजच्या माध्यमातून आदिवासी भागातील गरजांचा शोध घेऊन त्यावर नाविन्यपूर्ण तंत्रज्ञानाच्या माध्यमातून उपाययोजना शोधण्याचा प्रयत्न केला जाणार असल्याचे प्रतिपादन मुंबईच्या रासायनिक तंत्रज्ञान संस्थेचे माजी संचालक, प्रा.जे.बी.जोशी यांनी केले.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या सिलेज एरिया डेव्हल्पमेंट उपक्रमांतर्गत शुक्रवार दि.६ ते ८ डिसेंबर या कालावधीत मुंबईच्या रासायनिक तंत्रज्ञान संस्थेचे माजी संचालक, प्रा.जे.बी.जोशी व त्यांचे सहकारी प्राध्यापक हे नंदुरबार जिल्ह्यातील काही गावांना भेटी देऊन आदिवासी भागातील समस्या जाणून घेणार आहेत. त्याचाच एक भाग म्हणून कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील यांच्या अध्यक्षतेखाली या सगळया चमूची बैठक झाली. या बैठकीत प्रा.जोशी बोलत होते. ते म्हणाले की, सिलेजच्या माध्यमातून संधी शोधल्या जाणार आहेत. आदिवासी भागात पर्यावरणपुरक उपक्रम राबविणे, सोलर एनर्जी, बायोमास संशोधन उपक्रम, जैविक खते आदी काही उपक्रम राबविले जातील त्यासाठी रासयनिक तंत्रज्ञान संस्थेच्या माध्यमातून सहकार्य केले जाणार आहे. शहरातील सुविधा खेड्यातही उपलब्ध व्हाव्यात हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे. शहरात राहणाऱ्या शास्त्रज्ञांना खेड्याकडे नेऊन तेथील गरजांवर शोध घेण्याचे मोठे आव्हान देखील उभे आहे. स्वच्छता, आरोग्य, राहणीमान, शिक्षण या संदर्भात योग्य मार्गशर्दशन करण्याची गरज आहे. इस्त्रायल सारख्या थोट्या देशात ज्ञानाच्या निर्यातिकरणावर साठ टक्के उत्पन्न प्राप्त होते. याकडे डॉ.जोशी यांनी लक्ष वेधले.

अध्यक्षीय भाषणात कुलगुरु प्रा.पी.पाटील यांनी या उपक्रमाच्या माध्यमातून आदिवासी बहुल भागात काही नवे प्रयोग यशस्वी होतील असा आशावाद व्यक्त केला. प्रारंभी या उपक्रमाचे प्रमुख अन्वेषक प्रा.एस.टी.बेंद्रे यांनी प्रास्ताविक केले. यावेळी मंचावर व्य.प.सदस्य दिलीप पाटील, डॉ.व्ही.व्ही देवधर, डॉ. अजित पाटणकर, डॉ. सुधीर पानसे तसेच सौ.जोशी, सौ.पानसे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन स्वप्नाली पाटील यांनी केले. या बैठकीनंतर हा सर्व चमू नंदुरबार जिल्ह्याकडे रवाना झाला. जिल्ह्यातील बारीपाडा, खांडबारा, शितलपाडा, नगाव, बालअमराई या गावांना पुढील तीन दिवसात भेटी देऊन विविध घटकांशी संवाद साधणार आहेत. यामध्ये स्वयंनिर्वाही गट, शेतकरी यांचा समावेश असेल. त्या भागातील समस्या जाणून घेऊन त्यावर कोणत्या प्रकारच्या उपाययोजना करता येतील हे पाहणार आहेत. या चमूत रासायनिक तंत्रज्ञान संस्थेतील बारा प्राध्यापक, चोवीस संशोधक विद्यार्थी आहेत.

---

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी